ePaper
| वर्ष - 8 | अंक - 33 || UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 7 ऑगस्ट 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# "आरक्षण घेण्यासाठी आता एकच पर्याय", मनोज जरांगे



## आतील पानांत


- आता खड्ड्यांच्या तक्रारींचा 'पाऊस'
- ठाकरेंना हद्दपार करण्याचे राजकारण!
- जिनिलीयाला दिल्या हटके शुभेच्छा
- रिंकूच्या उत्तरांनी अनेकांचे लक्ष वेधले


## पुणे जिल्ह्यातील पवना, चासकमान, आंद्रा, नीरा देवघर, वीर, डिंभे धरणे 90 टक्क्यांपुढे भरली

# पुण्यात पावसाचं धुमशान!

## खडकवासल्यातील चारही धरणक्षेत्रात दमदार, टेमघर 100 टक्के फुल्ल

। पुणे । महाईन्यूज

**खडकवासला प्रकल्पातील चारही धरणक्षेत्रांसह घाटमाथ्यावर रविवारी दिवसभर झालेल्या पावसामुळे प्रकल्पातील टेमघर धरण रविवारी १०० टक्के भरले. खडकवासला ९४ टक्के भरले आहे. उजनी धरण ९० टक्के आणि पुणे जिल्ह्यातील पवना, चासकमान, आंद्रा, नीरा देवघर, वीर, डिंभे ही धरणे ९० टक्क्यांपुढे भरली आहेत.**



खडकवासला प्रकल्पातील चारही धरणक्षेत्रांसह घाटमाथ्यावर रविवारी दिवसभर झालेल्या पावसामुळे प्रकल्पातील टेमघर धरण रविवारी १०० टक्के भरले. खडकवासला ९४ टक्के भरले आहे. उजनी धरण ९० टक्के आणि पुणे जिल्ह्यातील पवना, चासकमान, आंद्रा, नीरा देवघर, वीर, डिंभे ही धरणे ९० टक्क्यांपुढे भरली आहेत. जिल्ह्यातील भाटघर, कळमोडी ही धरणेही १०० टक्के भरली. खडकवासला प्रकल्पातून रविवारी सायंकाळी पाच वाजेपासून ४५ हजार ७०० क्युसेकने आणि जिल्ह्यातील अन्य धरणांच्या पातळीनुसार, विसर्ग करण्यास जलसपंदा विभागाने सुरुवात केली आहे.

### 'खडकवासला' 94 टक्के

खडकवासला धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील धरणांत रविवारी दिवसभर पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे प्रकल्पातील टेमघर धरण सायंकाळी १०० टक्के भरले. टेमघर धरणात दिवसभरात ११० मिलिमीटर पावसाची नोंद झाली. खडकवासला धरणात सायंकाळी पाच वाजेपर्यंत ४६ मिमी, पानशेतमध्ये ९४ मिमी, वरसगावमध्ये १०२ मिमी पाऊस झाला. धरण प्रकल्पात सायंकाळी पाच वाजेपर्यंत प्रकल्पात २७.४५ अब्ज घनफूट (टीएमसी) म्हणजेच ९४.१८ टक्के पाणी जमा झाले आहे. त्यामुळे धरणातून विसर्ग करण्याचा निर्णय घेतल्याचे जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

### भाटघर, कळमोडी 100 टक्के

टेमघर धरणापाठोपाठ पुणे जिल्ह्यातील अनेक भागांत झालेल्या पावसामुळे भाटघर धरण १०० टक्के भरले असून, साडेपाच वाजता धरणातून २६ हजार १३१ क्युसेकने विसर्ग सुरू करण्यात आला. कळमोडी धरणही १०० टक्के भरले आहे. पिंपरीला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणही ९२ टक्क्यांपेक्षा जास्त भरले आहे. चासकमान, भामा आसखेड, आंद्रा, वडिवळे, गुंजवणी, नीरा देवघर, वीर ही नीरा खोऱ्यातील आणि येडगाव, डिंभे, चिल्हेवाडी ही कुकडी खोऱ्यातील धरणे ९० टक्क्यांपेक्षा जास्त सायंकाळी भरल्यामुळे धरणातून विसर्ग करण्यात आला.

### पातळी वाढल्याने विसर्ग सुरू

**खडकवासला प्रकल्पातील धरणांत पाऊस होत असल्याने धरणांमधून पाणी विसर्ग करण्यास रविवारी सकाळपासून सुरुवात झाली. पानशेत धरणातून दुपारी चार वाजता १२ हजार ४३२ क्युसेकने; तसेच वरसगाव धरणातून १२ हजार ४५८ क्युसेकने पाणी सोडण्यात आले. खडकवासल्यातून सकाळी नऊ वाजता २९ हजार ४१४ क्युसेकने पाणी विसर्ग करण्यास सुरुवात झाली. त्यात वाढ करून दुपारी ३५ हजारने आणि सायंकाळी पाच वाजता ४५ हजार ७०० क्युसेकने रात्री उशिरापर्यंत पाणी सोडण्यात येत होते.**

### उजनी भरले 92 टक्के

खडकवासला प्रकल्पातील धरणांची पातळी वाढल्याने धरणातून ४५ हजार ७०० क्युसेकने पाणी सोडण्यास सुरुवात झाली. त्यामुळे उजनी धरणात सायंकाळी पाच वाजेपर्यंत ९० टक्के पाणीसाठा जमा झाला आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील पिण्यासह शेतीच्या पाण्याची चिंता मिटली आहे.

# निगडी येथे सराईत रिक्षा चोरास अटक

## चार चोरीच्या रिक्षा हस्तगत; गुन्हे शाखा युनिट 2 ची कारवाई

। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।




निगडी येथे सराईत रिक्षा चोराला सापळा रचून अटक करण्यात आली आहे. त्या सराईताकडून चार चोरीच्या रिक्षा देखील हस्तगत करण्यात आल्या आहेत. गणेश दत्तु सुर्यवंशी (वय ३० वर्षे रा. ओटास्किम, निगडी) असे अटक केलेल्या सराईत आरोपीचे नाव आहे. पिंपरी चिंचवड पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट २ ने ही कारवाई केली आहे. पिंपरी चिंचवड पोलीस उप आयुक्त (गुन्हे) संदिप डोईफोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार (दि.०४) रोजी गुन्हे शाखा युनिट दोनचे पोलीस नाईक देवा राऊत यांना मिळाली कि, एक इसम चोरीची ऑटो रिक्षा घेवून ओटास्किम निगडी भागात फिरत आहे. त्यानुसार गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचे एक पथक तयार करुन तात्काळ ओटास्किम भागात पाठविले. भक्ती शक्ती चौक ते त्रिवेणी चौक रोडवर शोध घेत असतांना TVS कंपनीची ओटो रिक्षा नंबर MH 14 CU 0481 ही सुसाट चालवित संशयित इसम चालवित असल्याचे पोलीस पथकाच्या निदर्शनास आले.

### अशी होत होती रिक्षाची चोरी आणि विक्री..

**आरोपी गणेश दत्तु सुर्यवंशी हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असुन त्याच्या विरुध्द यापुर्वी चोरीचे गुन्हे नोंद आहेत. आरोपीत हा हॅन्डल लॉक नसलेल्या, निर्जनस्थळी पार्कींग केलेल्या प्रवाशी वाहतूकीच्या रिक्षा बनावट चावीचा वापर करुन चोरी करीत होता. चोरीच्या रिक्षा अशिक्षीत लोकांना विक्री करुन पैसे कमविण्याचे प्रयत्नात असतांना त्याला गुन्हे शाखेकडून पकडण्यात आले आहे. नागरिकांनी आपली वाहने सुरक्षित ठिकाणी, हॅन्डल लॉक करुन पार्कींग करावीत व संशयित इसमांबाबत तात्काळ नियंत्रण कक्षाला माहीती कळवावी असे आवाहन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने करण्यात आले आहे.**

# आता खड्ड्यांच्या तक्रारींचा 'पाऊस'

## तक्रार करण्यासाठी महापालिकेची विशेष व्यवस्था

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुसळधार पावसाने शहर खड्डयांमध्ये गेले असताना, आता शहरात कोठे खड्डे पडले आहेत, याच्या तक्रारी महापालिकेकडे करता येणार आहेत. त्यासाठी महापालिकेने विशेष दूरध्वनी सेवा सुरू केली आहे. त्या ठिकाणी नागरिकांना खड्डयांची माहिती देण्याबरोबरच तक्रारी करता येणार आहेत.**



दरम्यान, पावसाने उघडीप दिल्याने महापालिकेने खड्डे दुरुस्तीचे काम हाती घेतले असून, तीन दिवसांत प्रमुख रस्त्यांवरील १ हजार २२४ खड्डे बुजविण्यात आले आहेत. तसेच १५३ खड्डयांमध्ये 'पॅचवर्क' करण्यात आले आहे. ज्या रस्त्यांवर जास्त खड्डे आहेत, अशा रस्त्यांची 'रीसरफेसिंग'ची कामे करण्यात येणार आहेत. त्यासाठी महापालिकेला पुन्हा काही कोटी रुपये खर्च करावे लागणार आहेत. शहरात झालेल्या सततच्या पावसाने रस्त्यांची दुरवस्था झाली असून, रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले आहेत. रस्त्यांची चाळण झाल्यानंतर महापालिका प्रशासनावर जोरदार टीका करण्यात आली होती. महापालिकेचे विविध विभाग, शासकीय आणि निमशासकीय संस्थांकडून पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी गेल्या वर्षभरात मोठ्या प्रमाणावर खोदाईची कामे करण्यात आली. या कामांमुळे आणि सततच्या पावसामुळे रस्त्यांची दुरवस्था होण्यास सुरुवात झाली होती. त्यातही डांबरी रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडल्याचे दिसून आले होते.

मात्र, पावसाने उघडीप न घेतल्याने रस्ते दुरुस्तीच्या कामाला मर्यादा येत होत्या. त्यामुळे शनिवारपासून रात्री खड्डे बुजविण्याची मोहीम सुरू करण्यात आली होती. रस्त्यांवर पडलेले खड्डे आणि त्यावर करायचे 'पॅचवर्क' या दोन्ही कामांवर महापालिकेच्या पथ विभागाकडून लक्ष केंद्रित करण्यात आले. सिमेंटचा वापर करून खड्डे बुजविण्यास सुरुवात झाली असून, 'पॅचवर्क'साठीही सिमेंटचा वापर करण्यात येत आहे. तसेच अनेक खड्डे आणि 'पॅचवर्क' डांबरी मालाच्या साहाय्याने बुजविण्यात आल्याची माहिती पथ विभागाचे मुख्य अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी दिली. नागरिकांकडून खड्डयांसंदर्भात पथ विभागाला माहिती कळविण्यात आल्यानंतर त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेने विशेष दूरध्वनी सेवा सुरू केली आहे. ०२०- २५५०१०८३ किंवा ९०४३२७१००३ या दूरध्वनी क्रमांकांवर नागरिकांना खड्डयांची माहिती आणि तक्रार करता येणार असल्याचे महापालिकेकडून सांगण्यात आले. दरम्यान, पावसाने उघडीप दिल्याने महापालिकेने खड्डे दुरुस्तीचे काम हाती घेतले असून, तीन दिवसांत प्रमुख रस्त्यांवरील १ हजार २२४ खड्डे बुजविण्यात आले आहेत. तसेच १५३ खड्डयांमध्ये 'पॅचवर्क' करण्यात आले आहे. ज्या रस्त्यांवर जास्त खड्डे आहेत, अशा रस्त्यांची 'रीसरफेसिंग'ची कामे करण्यात येणार आहेत. त्यासाठी महापालिकेला पुन्हा काही कोटी रुपये खर्च करावे लागणार आहेत. शहरात झालेल्या सततच्या पावसाने रस्त्यांची दुरवस्था झाली असून, रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले आहेत. रस्त्यांची चाळण झाल्यानंतर महापालिका प्रशासनावर जोरदार टीका करण्यात आली होती.

### खड्ड्यांची माहिती देण्याचे आवाहन

पथ विभागाला माहिती कळविण्यात आल्यानंतर त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेने विशेष दूरध्वनी सेवा सुरू केली आहे. ०२०- २५५०१०८३ किंवा ९०४३२७१००३ या दूरध्वनी क्रमांकांवर नागरिकांना खड्डयांची माहिती आणि तक्रार करता येणार असल्याचे महापालिकेकडून सांगण्यात आले. या कामांमुळे आणि सततच्या पावसामुळे रस्त्यांची दुरवस्था होण्यास सुरुवात झाली होती. त्यातही डांबरी रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडल्याचे दिसून आले होते.

# पुण्यासाठी २१.४८ टीएमसी पाणी कोट्याची मागणी

## महापालिकेकडून जलसंपदा विभागाला पाण्याचे अंदाजपत्रक सादर

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन सन २०२४-२५ या वर्षासाठी २१.४८ अब्ज घनफूट (टीएमसी) पाणी कोट्याची मागणी महापालिकेने केली आहे.**



महापालिकेने पाण्याचे अंदाजपत्रक जलसंपदा विभागाकडे सादर केले असून, त्यामध्ये पाणीकोटा वाढविण्याची मागणी केल्याने जलसंपदा विभाग आणि पाणीपुरवठा विभाग आमने-सामने येण्याची शक्यता आहे. महापालिकेच्या मागणीनुसार शहरासाठी वाढीव पाणीकोटा मंजूर होणार का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. शहराला खडकवासला धरण साखळी प्रकल्पातून पाणीपुरवठा केला जातो. गेल्या वर्षी शहरासाठी २०.९० टीएमसी पाणी मंजूर करावे, असा प्रस्ताव महापालिकेने दिला होता. मात्र शहरासाठी १२.८२ टीएमसी एवढा पाणीकोटा मंजूर करण्यात आला होता. खडकवासला धरणातून पाणी घेण्यासंदर्भात महापालिका आणि जलसंपदा विभाग यांच्यात करार झाला आहे. त्या करारानुसार महापालिकेला वार्षिक १२.४१ टीएमसी एवढे पाणी उपलब्ध करून दिले जाते. मात्र, शहराची वाढती लोकसंख्या, भौगोलिक विस्तार, स्थलांतरीत लोकसंख्या लक्षात घेऊन महापालिकेकडून गेल्या काही वर्षांत सातत्याने जास्त पाणीकोट्याची मागणी केली जात आहे. राज्य जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या आदेशानुसार महापालिकेकडून दरवर्षी पाण्याचे अंदाजपत्रक केले जाते. ते अंदाजपत्रक जलसंपदा विभागाला सादर केले जाते.

### या वर्षी वाढीव पाणीकोट्याचा दावा

महापालिका हद्दीत समाविष्ट झालेली ३४ गावे आणि शहराची ७७ लाख लोकसंख्या गृहीत धरून ही मागणी करण्यात आली आहे. महापालिकेने अंदाजपत्रकामध्ये लोकसंख्येच्या वाढीत सरासरी दोन टक्के वाढ गृहीत धरली आहे. पुढील वर्षभरात शहराची लोकसंख्या ७९ लाख ३९ हजार ९७४ एवढी होईल, असे नमूद केले आहे. शहरात होणारी ३५ टक्के पाणी गळती लक्षात घेऊन या वर्षी वाढीव पाणीकोट्याचा दावा केला आहे. समाविष्ट ३४ गावातील लोकसंख्या १८ लाख ११ हजार ३४० एवढी असल्याचेही नमूद करण्यात आले असून, समाविष्ट गावांसाठी २.१५ टीएमसी पाण्याची आवश्यकता असल्याचे महापालिका प्रशासनाकडून प्रस्तावात म्हटले आहे.

# मेट्रोच्या कामासाठी 57 झाडांवर कुऱ्हाड!

## पुणे महामेट्रोच्या वतीने पिंपरी ते निगडी या विस्तारित मार्गाचे काम सुरू

। पिंपरी।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी ते निगडी या मार्गावर ४.४१ किलोमीटर अंतराची मेट्रोची मार्गिका तयार केली जाणार आहे. त्याचे काम सुरू करण्यात आले आहे. कामास अडथळा ठरत असल्याने पंधरा वर्षे जुनी झाडे तोडण्यात येत आहेत. मेट्रोच्या 'व्हायाडक्ट'चे काम रेल विकास निगमकडून केले जात आहे. निगडी येथील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पीएमपीएमएल बस आगाराजवळ खांब (पिलर) उभारण्यात येत असून, अडथळा ठरणारी झाडे तोडली जात आहेत.**





निगडीतील वर्तुळाकार उड्डाण पुलाजवळील श्रीकृष्ण मंदिरालगतच्या पदपथावरील झाडे तोडण्यास सुरुवात करण्यात आली. तेथील नऊ झाडे तोडण्यात आली आहेत. निगडी ते पिंपरीपर्यंतच्या पदपथावरील झाडे तोडली जात असल्याने वृक्षप्रेमींनी नाराजी व्यक्त करीत वृक्षतोडीस विरोध केला. या संदर्भात महापालिकेकडे तक्रार करण्यात आली आहे.

### 57 झाडांवर कुऱ्हाड

टबोबियाची १८, पेल्टाफोरमची, फिस्टेलमापची प्रत्येकी नऊ, कडुनिंब, वड, अशोकाची दोन, पिंपळाची पाच, उंबराची चार, फायकस, रेन ट्री ए, अशोक, स्पॅथोडिया, जांभूळ, फणसाचे प्रत्येकी एक अशी एकूण ५७ झाडे तोडली जाणार आहेत. त्यातील ५० झाडे महापालिकेची असून, सात झाडे श्रीकृष्ण मंदिर ट्रस्टच्या मालकीची आहेत.

### गुन्हा दाखल करण्याची मागणी

महापालिका एकीकडे वृक्षारोपण करीत आहे, तर महामेट्रो ती झाडे तोडत आहे. मेट्रो मार्गिकेचा ठेकेदार हे काम करीत नसून, त्याने नेमलेल्या उपठेकेदाराकडून वृक्षतोड केली जात आहे. संबंधित ठेकेदारांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अविनाश वाघमारे यांनी केली.

### महापालिकेची परवानगी

मेट्रोच्या मार्गिकेस अडथळा ठरणारी झाडे हटविण्यात येत आहेत. त्याला महापालिकेने परवानगी दिली आहे. एका झाडाच्या बदल्यात दहा झाडे लावली जाणार आहेत. जगतील अशा झाडांचे पुनर्रोपण केले जाईल, असे महामेट्रोचे संचालक डॉ. हेमंत सोनवणे यांनी सांगितले. तर, कामास अडथळा ठरणारी झाडे हटविण्याबाबत महामेट्रोने महापालिकेकडे अर्ज केला होता. त्यानुसार परवानगी दिली आहे. जगणाऱ्या झाडांचे पुनर्रोपण करणे आणि एका झाडाच्या बदल्यात दहा झाडे कासारवाडी येथील मैलाशुद्धीकरण केंद्रात लावावीत. त्यांची तीन वर्षे देखभाल करावी, अशी अट ठेवली असल्याचे उद्यान विभागाचे उपायुक्त रविकिरण घोडके म्हणाले.

---

# रुपीनगर- तळवडे परिसरात विकासकामांचा 'मान्सून धमाका'

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा झंझावात; एकाच दिवशी तब्बल 16 विकासकामांचा "श्रीगणेशा'

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रुपीनगर- तळवडे भागातील सर्वसामान्य नागरिकांच्या मागणीनुसार, विविध विकासकामांचा अक्षरश: 'मान्सून धमाका' सुरू आहे. एकाच दिवसांत या भागातील लहान-मोठ्या १६ विकासकामांचा "श्रीगणेशा" करण्यात आला. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.**



भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने रुपीनगर- तळवडे येथील विविध विकासकामाना चालना देण्यात आली. यावेळी माजी नगरसेवक शांताराम भालेकर, पांडुरंग भालेकर, निलेश भालेकर, भाजपाचे किरण पाटील, अस्मिता भालेकर, डॉ. सोमवंशी, शिरीष उत्तेकर, संदीप जाधव, रमेश भालेकर, अनिल भालेकर, शरद भालेकर, रवि सेठसंधी, प्रमोद भालेकर, एस. डी. भालेकर, मुन्ना पवार, ज्ञानेश्वर उर्फ माऊली भालेकर यांच्यासह स्थानिक नागरिक आणि सोसायटींमधील नागरिक उपस्थित होते. पुणे- पिंपरी-चिंचवड आणि मावळ परिसरात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पावसाने झोडपून काढले. त्यामुळे शहर आणि उपनगरांमधील सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचले. रुपीनगर- तळवडे भागात वीज, पाणीपुरवठा आणि विविध विकासकामे ठप्प झाली. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना नाहक मन:स्ताप सहन करावा लागला. मात्र, पावसाने काहीशी उघडीप दिल्यानंतर आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून विविध विकासकामे सुरू करण्यात आली आहेत.

### ... ही विकासकामे लागली मार्गी!

रुपीनगर- तळवडे भागातील आयकॉन हॉस्पिटल रस्ता, टॉवर लाईन येथील कमलेश भालेकर व सुनील भालेकर यांच्या घराकडे जाणारा रस्ता, त्रिवेणीनगर येथील अशोक भालेकर व बापु भालेकर यांच्या घराकडे जाणारा रस्ता, एस.के. बापु यांच्या घराशेजारील रस्ता, ज्योतिबानगरहून सोनवणेवस्तीकडे जाणारा रस्ता, तळवडे गाव येथील पंकज आवटे यांच्या घराकडे जाणारा रस्ता, सप्तश्रृंगी सोसायटीतील गणेश मंदिर, गजानन सोसायटीतील गणेश मंदिर, जलमय श्रीराम कॉलनीतील सी.डी. वर्क, नाला रुंदीकरण, स्ट्रॉम वॉटर लाईन, निसर्ग सोसायटीमधील साई मंदिर, संगम सोसायटीतील सभामंडप, श्रमसाफल्य सोसायटी व द्वारका सोसायटीमधील साई मंदिर, विजयानंद सोसायटीतील नागरिकांसाठी 'ट्रेकिंग पार्क', इंद्रायणी सोसायटीतील साई मंदिर सभामंडप, दक्षता गणपती मंदिराचा जीर्णोद्धार आदी कामांना गती देण्यात आली आहे.

"पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतीत रुपीनगर-तळवडे गावचा समावेश १९९७ मध्ये झाला. मात्र, समाविष्ट गावांना विकासापासून वंचित रहावे लागले आहे. नैसर्गिक आपत्तीच्या काळात नागरिकांच्या घरात पाणी शिरले. रस्ते, वीज, पाणीपुरवठा अशा पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार आम्ही विविध कामे हाती घेतली आहेत. पावसाने उघडीप दिल्यास सदर कामे तात्काळ मार्गी लावण्याबाबत महानगरपलिका, महावितरण संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत.

**-महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# ठाकरेंना हद्दपार करण्याचे राजकारण!



भूमिका

**लोकसभा निवडणुकीत जनतेने उद्धव बाळासाहेब ठाकरे यांना साथ दिली, त्यामुळे निराश झालेला भाजप उद्धव ठाकरे यांना राजकारणातून नामशेष करण्याचा प्रयत्न करत आहे, असा दावा करणारा आणि 'ठाकरेंचे वक्तव्य नैराश्याचे द्योतक' या 'पहिली बाजू'चा (६ ऑगस्ट) प्रतिवाद करणारा लेख...**





गेली दहा वर्षे भाजप उद्धव ठाकरे यांना आणि त्यांच्या कुटुंबाला उद्ध्वस्त करून सत्तेचा मलिदा स्वत:च्या मित्रांना वाटून महाराष्ट्र ओरबाडण्याचा प्रयत्न करत आहे. बाळासाहेब ठाकरे यांचा खरा अनुयायी या मनोवृत्तीला कधीही यशस्वी होऊ देणार नाही. या मनोवृत्तीचे निर्मूलन करण्यासाठीच उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी शड्डू ठोकला आणि 'एक तर तू राहशील अन्यथा मी,' असे आव्हान दिले. भाजपला सध्या जळी स्थळी काष्ठी पाषाणी केवळ आणि केवळ उद्धव ठाकरेच दिसू लागले आहेत. उद्धव बाळासाहेब ठाकरेंना राजकारणातून हद्दपार करण्याचा प्रयत्न अलीकडे भाजपकडून सातत्याने होताना दिसतो, मात्र त्यांनी कितीही प्रयत्न केले, तरी त्यांना ते शक्य होणार नाही. हे लक्षात आल्यामुळेच त्यांनी उद्धव ठाकरेंबद्दल गैरसमज पसरवण्यास सुरुवात केली. कधी 'औरंगजेब फॅन क्लब' तर कधी 'मुसलमानांचे मसीहा' कधी 'मराठ्यांचे विरोधक' तर कधी 'दलित समाजाचा तारणहार' असा उल्लेख करून विविध मार्गांनी जाती- धर्मात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केवळ भाजपच्या वरिष्ठांना खूश करण्यासाठी सुरू आहे. परंतु हे सर्व प्रयत्न सातत्याने फोल ठरत आले आहेत.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी आपले राजकारणातील वेगळेपण, सहृदयीपण मुख्यमंत्रीपदाच्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात उभ्या जगाला सिद्ध करून दाखवले. राज्याचा, देशाचा नेता कसा असावा, त्याने कसे वागावे याचा वस्तुपाठच त्यांनी पुढच्या असंख्य पिढ्यांसाठी घालून दिला. जागतिक साथीच्या काळात ते छातीचा कोट करून उभे ठाकले. म्हणूनच जागतिक आरोग्य संघटनेपासून ते अगदी सर्वोच्च न्यायालयापर्यंत सर्वांनीच उद्धव ठाकरे यांचे कौतुक केले. त्यांच्या या स्वकर्तृत्वाने मिळवलेल्या यशामुळे भाजपचे नेते बावचळले, खचले आणि काहीही करून उद्धव ठाकरेंना राजकारणातून नामशेष करण्याचा चंगच त्यांनी बांधला. तसे केले नाही, तर आपल्याला महाराष्ट्र कधीच ओरबाडता येणार नाही, हे त्यांच्या लक्षात आले होते.

तिथून पुढील काळात भाजपने ईडी, सीबीआय, आयटी यांचा गैरवापर करून उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतील गळतीवीरांना, कमजोर मनोवृत्तीच्या भ्रष्टाचारी राजकारण्यांना गळाला लावले आणि सुरत, गुवाहाटी, गोवा आणि मुंबईची सफर घडवून सत्ता आपल्या हातात घेतली. एवढे सारे करूनही उपयोग होईना. राजकीय प्रतिमाभंजन होईना. उद्धव ठाकरे यांच्याविषयीचे जनतेतील प्रेम काही कमी होईना, हे पाहून पहाटेचा शपथविधीफेम नेत्यांनाही सोबत घेतले. मराठा ओबीसी अशी मोळी बांधून उद्धव ठाकरेंना नमोहरम करण्याचा प्रयत्न झाला; अगदी उद्धव ठाकरे यांना 'नकली संतान'देखील म्हणून झाले, मात्र त्याचाही काही उपयोग झाला नाही. भाजपच्या नाकावर टिच्चून तब्बल ३१ खासदारदेखील निवडून दिले. त्यामुळे निराश झालेल्या भाजपच्या नेत्यांनी मग त्यांना 'औरंगजेब फॅन क्लब'ची उपमा दिली. पुन्हा पुन्हा तोच डाव खेळण्याचा प्रयत्न ते करू पाहत आहेत. पण ठाकरे समजून घेण्यासाठी आणि त्यांची कार्यपद्धत अभ्यासण्यासाठी अशा आणखी काही पिढ्या खर्च कराव्या लागतील. उद्धव ठाकरे हे कधीही दिखाव्याचे राजकारण करत नाहीत. नक्कलवीर, खुशमस्करे अशी त्यांची प्रतिमा नाही. त्यामुळे त्यांनी स्वकर्तृत्वाने भाजपच्या भल्या भल्या नेत्यांना आस्मान दाखविले. शासकीय कंपन्या विकायच्या; सर्व प्रकल्प आपल्या मित्रांच्या- अदानी-अंबानी यांच्या घशात घालायचे; गोमाता गोमाता करून हिंदूंना भुलवत ठेवायचे आणि गोमांस विकणाऱ्या कंपन्यांकडून निवडणूक रोखे घ्यायचे; देशातील भोळ्या जनतेकडून रामाच्या नावाने मंदिर उभारण्यासाठी पैसे गोळा करायचे आणि जागतिक साथीच्या नावाखाली पीएम केअर फंड म्हणून पैसे गोळा करून त्यातून स्वहितासाठी मित्रांची कर्जे फेडायची अशी भाजपची कार्यपद्धती आहे. महाराष्ट्रातील सर्व उद्योग गुजरातला पळविण्यात येत आहेत.

## संपादकीय »

### लालयेत पंचवर्षाणि

***करण्यातील यश हे 'पर्यटन वाढले' यापेक्षा अधिक भरीव आणि व्यापक असायला हवे. तसे गेल्या पाच वर्षांत घडले का?***

'अनुच्छेद ३७०' रद्द करण्याचा प्रस्ताव संसदेच्या दोन्ही सभागृहांकडून मंजूर करवून घेतला त्यास ६ ऑगस्ट रोजी पाच वर्षे पूर्ण होतात. जम्मू-काश्मीरला 'मुख्य प्रवाहात' (?) आणण्यासाठी त्या राज्याचा विशेष दर्जा काढून घेणे हा(च) उपाय आहे हे भाजप आणि तद्संबंधी विचारधारांचे नेहमीच म्हणणे होते. अयोध्येत 'बाबरी मशिदी'च्या जागी प्रभु श्रीराम मंदिर उभारणे हा जसा भाजप आणि त्या विचारधारांतील अनेकांच्या मते धार्मिक अस्मितेचा मुद्दा होता तसाच जम्मू-काश्मीरचा विशेष दर्जा काढणे त्यांच्या मते राष्ट्रीय अस्मितेसाठी आवश्यक होते. जम्मू-काश्मीरचा विशेष दर्जा काढणे, अयोध्येत राम मंदिर आणि समान नागरी कायदा हे तीन विषय भाजपसाठी अत्यंत भावनिक. त्यांपैकी तृतीय विषयपूर्तीच्या आड ताजा लोकसभा निकाल असेल. यातही जम्मू-काश्मीरचा विशेष दर्जा काढण्यात भाजपस अधिक रस होता.

अभियंत्यांचा अभिशाप' हा 'लोकसत्ता'चा अग्रलेख (५ ऑगस्ट) हे या लिखाणाचे तात्कालिक निमित्त असले तरी, या लिखाणाचा भर आहे तो हा अभिशाप कसा मिळाला, यावर. दर्जेदार अभियंते घडवणाऱ्या तंत्रशिक्षणाचा ऱ्हास ही साधारण १९८० च्या दशकापासून सुरू झालेली प्रक्रिया आहे.

# उद्योगांसाठीचे धोरण शिक्षणापासून ठरवावे

केवळ शिक्षण संस्था नव्हे तर सरकारची धोरणे आणि एकंदर समाजाच्या वाढलेल्या महत्त्वाकांक्षा, त्यांना बाजाराने घातलेले खतपाणी असे अनेक घटक कारणीभूत आहे. पण त्यातला महत्त्वाचा घटक आहे तो धोरणाच्या प्राधान्यक्रमांचा. ज्या काही मोजक्या धोरणांवर सरकारचे तीव्र आणि सातत्यपूर्ण लक्ष असायला हवे ते म्हणजे तंत्र, शास्त्र, गणित शिक्षण. त्यातही तंत्रशिक्षण हे तत्काळ नसले तरी मोजक्या काळ रेषेवर उत्तम प्रगती घडविण्याचे साधन. पण यात एक मेख अशी की हे शिक्षण मूलतः असामान्य ज्ञान आणि शिकवण्याची उत्तम हातोटी असलेल्या मानवी शिक्षक संसाधन यावर अवलंबून! दुसरे म्हणजे अशा शिक्षण संस्था या कला, वाणिज्य या शाखांपेक्षा प्रयोगशाळेत आर्थिक गुंतवणूक मागणाऱ्या.हे दोन्ही साध्य होत नाही हे साधारणपणे १९८३ सालापासून लक्षात आले. कारण सरकारकडे भांडवल आणि नोकऱ्या दोन्ही संपत चालल्या होत्या. यावर आपली पूर्ण समाजवादी व्यवस्था काही सुधारणा मागते आहे हे १९९० च्या सुमारास



सोने गहाण टाकायची वेळ येईपर्यंत लक्षात आले नाही. पण त्याआधीच, तंत्रज्ञान शिक्षण राजकारण्यांच्या हाती सोपवणे भाग पडले होते, कारण पैसा त्यांच्याकडेच होता. आता शिक्षण संस्था या संस्थापकांच्या धोरणाशी बांधील होत्या. शिक्षणाचे- विशेषत: बाजारात मागणी असलेल्या तंत्रशिक्षणाचे – व्यावसायिकीकरण करायचे आणि त्यातून पुन्हा पैसा मिळवायचा हेच यातून सुरू झाल्याने बाजारू संधी घेणे यापेक्षा वेगळे शिक्षण व्यवसायाचे ध्येय राहिले नाही. यात दर्जा कोसळणे गृहीत होते. कारण प्रचंड फी देणाऱ्या विद्यार्थ्यांकडे पैसे आहेत पण गरजेचा असलेला शिक्षण कल नाही किंवा पुरेशी गुणवत्ता नाही अशी परिस्थिती! माझ्या एका प्राध्यापक मित्राने सांगितले की, इंजीनिअरिंगला प्रवेश दिलेल्या मुलांना इंग्रजीचा गंधसुद्धा नाही. तेव्हा संस्था चालकांनी, "मग आधी इंग्लिश शिकवा आणि नंतर तंत्रज्ञान विषय शिकवा!" अशी आज्ञा दिली. हे कोसळणे सर्व आघाड्यांवर सुरूच राहिले. आजतागायत! आज नोकरीसाठी मुलाखतीला येणाऱ्या अनेक अभियंत्यांना दहावीच्या पातळीवर असलेले गणित येत नाही; पण हातात पदवी मात्र आहे. आता दुसऱ्या आघाडीवर काय झाले ते पाहू. ऑटोमोबाईल, मशीनटूल, इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिकल, ऊर्जा, ईपीसी (इंजिनीअरिंग, प्रोक्युअरमेंट, कमिशनिंग) , बांधकाम, खाण, धातू या क्षेत्रांमध्ये स्वातंत्र्यानंतर जाणूनबुजून चांगले प्रयत्न झाले. टाटा, प्रीमियर, बजाज परफेक्ट मशीन टूल्स, किर्लोस्कर, लार्सन ॲण्ड टूब्रो आणि सार्वजनिक उद्योगांतही एचएमटी, इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन, भारत इलेक्ट्रिकल्स लिमिटेड (बेल), भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड (भेल), एनटीपीसी अशा नाममुद्रांनी (ब्रॅण्ड्स) अभियांत्रिकी क्षेत्रात नाव मिळवले; पण ते जोपर्यंत बंदिस्त अर्थव्यवस्था होती .

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# चुकीला माफी नाही : नाना पटोले

## विधानसभेच्या तिकीट वाटपासंदर्भात पटोलेंचं मोठं विधान

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज



**राज्यात विधानसभेची निवडणूक दोन महिन्यांमध्ये जाहीर होईल. त्यामुळे या निवडणुकीच्या अनुषंगाने सध्या राज्याच्या राजकारणात घडामोडींना वेग आलेला आहे. सर्वच राजकीय पक्षांनी विधानसभेसाठी जोरदार तयारी सुरु केली आहे. महायुती आणि महाविकास आघाडीमधील पक्षांमध्ये जागावाटपाबाबतही खलबतं सुरु आहेत. काही दिवसांपूर्वी राज्यात विधानपरिषद निवडणूक पार पडली होती. या निवडणुकीत महाविकास आघाडीला धक्का बसला होता.**

कारण विधानपरिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसच्या काही आमदारांनी क्रॉस वोटिंग करत महायुतीच्या उमेदवारांना मतदान केल्याचा आरोप केला जात आहे. आता यावरूनच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विधानपरिषदेच्या निवडणुकीत (VIDHAN SABHA ELECTION) क्रॉस वोटिंग करणाऱ्या आमदारांना इशारा दिला आहे. “कोणत्याही बदमाशाला पक्षात स्थान नाही. चुकीला माफी नाही”, असं नाना पटोले (NANA PATOLE) यांनी म्हटलं आहे.“काँग्रेसच्या हायकमांडकडून आता निर्णय घेण्यात आला आहे की, कोणत्याही बदमाशांना, यापुढे पक्षात स्थान दिलं जाणार नाही. काही लोक फक्त व्यापारासाठी पक्षात येतात. मात्र, याबाबतची स्पष्ट भूमिका काँग्रेस पक्षाने घेतलेली आहे”, असं नाना पटोले यांनी आज माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.काही दिवसांपूर्वी राज्यात विधानपरिषदेची निवडणूक पार पडली होती. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा व्हीप न जुमानता महायुतीच्या उमेदवारांना काँग्रेसच्या काही आमदारांनी मतदान केलं असल्याचा आरोप करण्यात येत आहे. याबाबत काँग्रेसच्या हायकमांडने प्रदेश काँग्रेसच्या नेत्यांकडून अहवाल मागवला होता तर क्रॉस वोटिंग करत महायुतीला मदत करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी काँग्रेसमधील पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आली होती. यानंतर आता काँग्रेस पक्षाशी दगाबाजी करणाऱ्यांचा आगामी विधानसभेला पत्ता कट करणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.

याच पार्श्वभूमीवर बोलताना आज प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही सूचक वक्तव्य करत इशारा दिला आहे. क्रॉस वोटिंग करणाऱ्या आमदारांसंदर्भात बोलताना नाना पटोले म्हणाले,“कोणालाही अभय दिलेलं नाही. ज्यांची कोणाची नाव यामध्ये आयडेंटिफाय झालेली आहेत, त्या कोणालाही अभय दिलेलं नाही. कारण चुकीला माफी नाही, अशी भूमिका काँग्रेसच्या (CONGRESS) हायकमांडकडून घेण्यात आलेली आहे”, असा इशारा नाना पटोले यांनी दिला आहे. दरम्यान, विधानपरिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसच्या जवळपास पाच ते सात आमदारांनी क्रॉस व्होटिंग करत महायुतीला मदत केल्याचा आरोप केला जात आहे. याबाबत काँग्रेसकडून अहवालही मागवण्यात आला होता. मात्र, त्यानंतर आता काँग्रेस हायकमांड येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत या आमदारांना धक्का देण्याची शक्यता आहे. कारण विधानपरिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसच्या काही आमदारांनी क्रॉस वोटिंग करत महायुतीच्या उमेदवारांना मतदान केल्याचा आरोप केला जात आहे. आता यावरूनच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विधानपरिषदेच्या निवडणुकीत (VIDHAN SABHA ELECTION) क्रॉस वोटिंग करणाऱ्या आमदारांना इशारा दिला आहे. “कोणत्याही बदमाशाला पक्षात स्थान नाही. चुकीला माफी नाही”, असं नाना पटोले (NANA PATOLE) यांनी म्हटलं आहे.“काँग्रेसच्या हायकमांडकडून आता निर्णय घेण्यात आला आहे की, कोणत्याही बदमाशांना, यापुढे पक्षात स्थान दिलं जाणार नाही. काही लोक फक्त व्यापारासाठी पक्षात येतात. मात्र, याबाबतची स्पष्ट भूमिका काँग्रेस पक्षाने घेतलेली आहे”, असं नाना पटोले यांनी आज माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.काही दिवसांपूर्वी राज्यात विधानपरिषदेची निवडणूक पार पडली होती.

### क्रॉस वोटिंग करणाऱ्यांवर कारवाई

या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा व्हीप न जुमानता महायुतीच्या उमेदवारांना काँग्रेसच्या काही आमदारांनी मतदान केलं असल्याचा आरोप करण्यात येत आहे. याबाबत काँग्रेसच्या हायकमांडने प्रदेश काँग्रेसच्या नेत्यांकडून अहवाल मागवला होता तर क्रॉस वोटिंग करत महायुतीला मदत करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी काँग्रेसमधील पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आली होती. आगामी विधानसभेला पत्ता कट करणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.

---

# आरक्षण घेण्यासाठी आता एकच पर्याय!

## जरांगे यांनी सरकारला पुन्हा एकदा इशारा देत सूचक विधान

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी केली आहे. जरांगे यांनी अनेकदा उपोषण, आंदोलनंही केलं. मात्र, अद्याप मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याच्या निर्णयासंदर्भात राज्य सरकारने कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही.**

यातच मनोज जरांगे यांनी केलेल्या मागणीला ओबीसी नेत्यांनी विरोध केल्यामुळे सध्या आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण सुरु आहे. अशातच मनोज जरांगे पाटील यांनी महायुतीच्या सरकारला पुन्हा एकदा इशारा देत सूचक विधान केलं.“आरक्षण घेण्यासाठी आमच्याकडे दुसरा पर्याय नाही, आता सत्तेत गेल्याशिवाय पर्याय नाही”, असं सूचक विधान मनोज जरांगे यांनी केलं आहे.“सर्वच पक्षांच्या मराठा समाजाच्या आमदारांनी त्यांना समजावून सांगणं गरजेचं आहे. आमचं हक्काचं ओबीसीमधून आरक्षण आम्हाला द्या. कारण आरक्षण देण्याचं केंद्र सत्ता आहे आणि सध्या सत्तेत ते आहेत. ते जर देणार नसतील तर आमच्यासमोर आरक्षण घेण्यासाठी दुसरा पर्याय काय? आता आमच्यापुढे एकच पर्याय, सत्तेत गेल्याशिवाय पर्याय नाही. गोरगरीबांना देणारं बनल्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे आम्हाला नाव ठेवायचं नाही की, तुम्ही राजकारणात गेला आहात. एवढ्या वेळेस सत्तेत जायची संधी आहे. राजकारण्यांना पायाखाली तुडवायची ही योग्य वेळ आहे”, असंही मनोज जरांगे यावेळी म्हणाले. ते एबीपी माझाशी बोलत होते.गेल्या काही दिवसांपासून राजकारण ढवळून निघालेलं नाही तर ढवळून काढलं आहे. सरकारने सत्तेचा गैरवापर केला आणि मराठ्यांच्या अंगावर ओबीसींचे नेते घातले. अशा प्रकारची सत्ता कधीही याआधी लोकांनी पाहिली नव्हती”, असा हल्लाबोलही मनोज जरांगे यांनी केला. “मला मराठा समाजाविरोधात बोललं की सहन होत नाही.



### मनोज जरांगेंची शांतता रॅली

सर्वांनी मिळून मला टार्गेट करायचं ठरवलं. त्यांना माहिती आहे की समाजाच्या प्रश्नांसाठी हा ताकदीने लढतो. याला तेथून बाजूला करायचं. त्यामुळे हे सर्व एकत्र आले आहेत. माझ्या विरुद्ध सर्वांनी षडयंत्र रचलं आहे. देवेंद्र फडणवीस यांनी अशा पाच ते सहा टोळ्या उभ्या केल्या आहेत. पण त्याचा काहीही फायदा होणार नाही”, असंही मनोज जरांगे म्हणाले.मराठा आरक्षणासाठी लढा देत असलेल्या मनोज जरांगे यांनी आता शांतता रॅलीच्या दुसऱ्या टप्प्याला सुरुवात केली आहे. सोलापूरमधून ७ ऑगस्टपासून शांतता रॅलीच्या दुसऱ्या टप्प्याला सुरुवात होणार आहे.

# बांगलादेश : अराजकतेमागे पाकिस्तान!

## जमात-ए-इस्लामी संघटना भारत विरोधी भूमिकेसाठी परिचित

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**बांगलादेशमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण करणे आणि त्या माध्यमातून शेख हसीना यांचे सरकार पाडण्याचे कारस्थान पाकिस्तानच्या आयएसआयच्या संस्थेच्या सहाय्याने लंडनमध्ये आखले गेल्याची माहिती गूप्तचर यंत्रणाकडून मिळत आहे. इंडिया टुडेने याबाबतचे वृत्त दिले आहे. बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीचे (BNP) प्रमुख आणि माजी पंतप्रधान खलिदा झिया यांचा मुलगा तारीक रहमान आणि आयएसआय अधिकाऱ्यांमध्ये सौदी अरेबियामध्ये बैठक झाली होती, अशी माहिती बांगलादेशी अधिकाऱ्यांनी दिली असल्याचेही इंडिया टुडेने आपल्या वृत्तात म्हटले आहे.**



एक्स साईटवरील काही बांगलादेशविरोधी हँडल्स हे सातत्याने आंदोलकांना चिथावणी देत होते. बांगलादेशी अधिकाऱ्यांनी अशा शेकडो पोस्ट हेरल्या आहेत, ज्या शेख हसीना यांच्या सरकारविरोधी आहेत. पाकिस्तानी हँडल्सवरूनही काही पोस्ट टाकण्यात आल्या आहेत.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार पाकिस्तानी लष्कर आणि आयएसआयला शेख हसीना यांचे सरकार घालवून पुन्हा एकदा बीएनपीची सत्ता स्थापन करायची आहे. बीएनपी पक्ष हा पाकिस्तानधार्जिणा पक्ष मानला जातो. शेख हसीना यांच्याविरोधातील आंदोलन तीव्र होऊन शेख हसीना या देशाबाहेर जाव्यात यासाठी चीननेही आयएसआयमार्फत प्रयत्न केले असल्याचे सांगितले जात आहे.सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये असलेल्या आरक्षणाविरोधात जुलै महिन्यात विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले. हळुहळु हे आंदोलन शेख हसीना यांच्या सरकारविरोधात उलटू लागले. आतापर्यंत आंदोलनात ३०० हून अधिक जणांचा बळी गेला आहे. तर शेकडो लोक जखमी झाले आहेत. बांगलादेशमधील गूप्तचर यंत्रणांनी दिलेल्या माहितीनुसार, आयएसआयचा पाठिंबा असलेल्या जमात-ए-इस्लामी संघटनेच्या इस्लामी छात्र शिबीर या विद्यार्थी शाखेने आंदोलन पेटवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. शेख हसीना यांचे सरकार उलथवून चीन आणि पाकिस्तानधार्जिणे सरकार आणण्यात या आंदोलनाने भूमिका बजावली, असे सांगितले जात आहे. जमात-ए-इस्लामी संघटना भारत विरोधी भूमिकेसाठी परिचित आहे. या संघटनेच्या विद्यार्थी आंदोलनाला राजकीय चळवळीचे स्वरुप देण्यात आले. बांगलादेशमध्ये विद्यार्थी आंदोलन सुरू झाल्यानंतर तेथील सोशल मिडियाचे निरीक्षण केल्यानंतर समजते की, बीएनपी पक्षाकडून अवामी लिग पक्षाविरोधात बऱ्याच पोस्ट टाकण्यात आल्या. यात आंदोलकांविरोधात हिंसा होणारे व्हिडीओ, शेख हसीना यांचे फलक फाडतानाचे फोटो आणि व्हिडीओ पोस्ट केले गेले. अमेरिकेशी संबंधित असलेल्या अकाऊंटवरून या चिथावणी देणाऱ्या पोस्ट आणखी वेगाने व्हायरल करण्यात आल्या. बांगलादेशसाठी १९७१ च्या स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी असलेल्या कुटुंबीयांसाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये ३० राखीव जागा ठेवण्यात आल्या होत्या. या राखीव जागांचा विरोध करण्यासाठी आंदोलनाची सुरुवात झाली. त्यानंतर बांगलादेशच्या सर्वोच्च न्यायालयाने राखीव जागा ३० टक्क्यांवरून पाच टक्क्यांवर आणल्या. मात्र त्यानंतरही आंदोलन सुरूच राहिले आणि आंदोलकांनी शेख हसीना यांच्या राजीनाम्याची मागणी केली. ४ ऑगस्ट रोजी आंदोलन चिघळले, ज्यामुळे १०० जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर ५ ऑगस्ट रोजी शेख हसीना यांनी पंतप्रधान पदाचा राजीनामा दिला.एक्स साईटवरील काही बांगलादेशविरोधी हँडल्स हे सातत्याने आंदोलकांना चिथावणी देत होते. बांगलादेशी अधिकाऱ्यांनी अशा शेकडो पोस्ट हेरल्या आहेत, ज्या शेख हसीना यांच्या सरकारविरोधी आहेत. पाकिस्तानी हँडल्सवरूनही काही पोस्ट टाकण्यात आल्या आहेआयएसआयला शेख हसीना यांचे सरकार घालवून पुन्हा एकदा बीएनपीची सत्ता स्थापन करायची आहे. बीएनपी पक्ष हा पाकिस्तानधार्जिणा पक्ष मानला जातो. शेख हसीना यांच्याविरोधातील आंदोलन तीव्र होऊन शेख हसीना या देशाबाहेर जाव्यात यासाठी चीननेही आयएसआयमार्फत प्रयत्न केले.

### गूप्तचर यंत्रणांनी दिली माहिती

असल्याचे सांगितले जात आहे.सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये असलेल्या आरक्षणाविरोधात जुलै महिन्यात विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले. हळुहळु हे आंदोलन शेख हसीना यांच्या सरकारविरोधात उलटू लागले. आतापर्यंत आंदोलनात ३०० हून अधिक जणांचा बळी गेला आहे. तर शेकडो लोक जखमी झाले आहेत. बांगलादेशमधील गूप्तचर यंत्रणांनी दिलेल्या माहितीनुसार, आयएसआयचा पाठिंबा असलेल्या जमात-ए-इस्लामी संघटनेच्या इस्लामी छात्र शिबीर या विद्यार्थी शाखेने आंदोलन पेटवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. शेख हसीना यांचे सरकार उलथवून चीन आणि पाकिस्तानधार्जिणे सरकार आणण्यात या आंदोलनाने भूमिका बजावली, असे सांगितले जात आहे.

# अंतरिम सरकार स्थापन करण्याच्या निर्णायाचं स्वागत

## बांगलादेशमधील परिस्थितीबाबत अमेरिकेची पहिली प्रतिक्रिया

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**बांगलादेशमध्ये राजकीय भूकंप झाला असून शेख हसीना यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला आहे. इतकंच नव्हे, तर त्यांना देश सोडून जावं लागल्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर या घडामोडींची चर्चा पाहायला मिळत आहे. येथील अराजक परिस्थितीवर आता जगभरातील देशांकडून चिंताही व्यक्त केली जात आहे. दरम्यान, बांगलादेशमधील परिस्थितीबाबत आता अमेरिकेनेही त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे.**



अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते मॅथ्यू मिलर यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे. शेख हसीना यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा देत बांगलादेशमधून पलायन केल्याची माहिती आम्हाला मिळाली आहे. आम्ही येथील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेऊन आहोत. अमेरिका येथील लोकांबरोबर आहे. आम्ही सर्वच घटकांना हिंचासार न करण्याचे आवाहन करत आहोत. मागच्या काही दिवसांत अनेकांनी आपला जीव मगावला आहे. त्यामुळे येथील नागरिकांनी शांती राखावी, असे ते म्हणाले.पुढे बोलताना त्यांनी बांगलादेशमध्ये अंतरिम सरकार स्थापन करण्याच्या निर्णयाचंही स्वागत केलं. बांगलादेशच्या लष्कराने देशाची सूत्र हातात घेतली असून तिथे लवकरच अंतरिम सरकार स्थापन होणार आहे. या निर्णयाचं आम्ही स्वागत करतो. मात्र, तोपर्यंत कोणतेही निर्णय कायद्यानुसार घेतले जातील, अशी आम्हाला अपेक्षा आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. तसेच बांगलादेशमधील मानवाधिकाराचं उल्लंघन झाल्याच्या काही घटना घडल्या आहेत.

### अनिश्चित काळासाठी संचारबंदी

त्या अतिशय दुर्दैवी आहेत, असेही ते म्हणाले.दरम्यान, बांगलादेशमध्ये चालू असलेल्या हिंसाचारात आतापर्यंत १०० पेक्षा जास्त लोकांचा बळी गेला आहे. आंदोलकांनी शेख हसीना यांचं कार्यालयही जाळलं आहे. शेख हसीना यांनी देश सोडल्यानंतर त्यांनी भारतात आश्रय घेतला आहे. तसेच बांगलादेशच्या लष्कराने प्रशासनावर तात्पुरता ताबा घेतला आहे. आरक्षणाच्या विरोधात सुरु असलेल्या आंदोलनाचं रूपांतर हिंसाचारात झालं. यानंतर सध्या बांगलादेशमध्ये अनिश्चित काळासाठी संचारबंदी लागू करण्यात आली आहे.

# पत्नीला पाहून खिलाडी अक्षय खळखळून हसला

अभिनेता अक्षय कुमारची (AKSHAY KUMAR) पत्नी ट्विंकल खन्ना (TWINKLE KHANNA) ही सोशल मीडियावर खूप ॲक्टीव असते. ट्विंकल आणि अक्षय हे त्यांच्या कुटुंबासह सुट्टीसाठी मालदीवला गेली आहे. जिथे ट्विंकलनं तिच्या संपूर्ण कुटुंबासोबत वाढदिवस देखील साजरा केला. ट्विंकलने आता एक व्हिडीओ शेअर केला आहे ज्यामध्ये मालदीवमध्ये तिच्यासोबत घडलेली एक मजेशीर घटना दिसत आहे. ट्विंकलनं या व्हिडीओला खास कॅप्शन देखील दिलं आहे. ट्विंकलनं शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये संपूर्ण ट्रीपची खास झलक दाखवली आहे. या व्हिडीओच्या सुरुवातीला ट्विंकल सायकल चालवताना दिसते सायकलिंग करताना तिचा तोल जातो आणि ती एका खांबाला धडकते, असं या व्हिडीओमध्ये दिसत आहे. अशाताच पत्नीला खांबाला धडकताना पाहून अक्षय कुमार खळखळून हसतो. ट्विंकलनं इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या मालदीव ट्रीपच्या व्हिडीओला कॅप्शन दिलं, 'माझी सायकल खांबाला धडकण्या व्यतिरिक्त, ही ट्रीप मला खरोखरच स्वर्गात गेल्यासारखी वाटली.तुमच्याकडे नवीन वर्षासाठी कोणतेही मोठे संकल्प असतील तर ते खाली कमेंटमध्ये शेअर करुन इतरांना प्रेरणा द्या' ट्विंकलनं शेअर केलेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. ट्विंकलनं शेअर केलेल्या या व्हिडिओमध्ये तुम्हाला ट्विंकलच्या वाढदिवसाच्या सेलिब्रेशनची झलकही पाहायला मिळेल. ज्यामध्ये ती केक कट करताना दिसत आहे. याशिवाय ट्विंकलनं तिथे तिच्या पुस्तकाची सक्सेस पार्टीही ठेवली

# रिंकूनं दिलेल्या उत्तरांनी अनेकांचे लक्ष वेधले

अभिनेत्री रिंकू राजगुरू (RINKU RAJGURU) ही तिच्या अभिनयानं नेहमीच प्रेक्षकांची मनं जिंकते. सैराट चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या रिंकूनं प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केलं आहे. रिंकू ही सोशल मीडियावर ॲक्टिव असते. रिंकूनं इन्स्टाग्रामवर नेटकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं दिली आहे. रिंकूनं दिलेल्या उत्तरांनी अनेकांचे लक्ष वेधले आहे. 'तुझं टोपणनाव काय आहे?' असा प्रश्न एका नेटकऱ्यानं रिंकूला इन्स्टाग्रामवर विचारला. या प्रश्नाला रिंकूनं उत्तर दिलं, 'रिंकू' त्यानंतर आणखी एका नेटकऱ्यानं रिंकूला प्रश्न विचारला, 'रिंकू हे तुझं टोपणनाव आहे तर मग तुझं खरं नाव काय आहे?' या प्रश्नाचं रिंकूनं उत्तर दिलं, 'प्रेरणा' रिंकूचं खरं नाव प्रेरणा आहे, हे अनेकांना माहित नसेल. 'झिम्मा-2 नंतर कोणता नवा प्रोजेक्ट येणार?' असा प्रश्न देखील एका युझरनं रिंकूला विचारला. या प्रश्नाला तिनं उत्तर दिलं, 'लवकरच कळवते.' 2023 मधील तुझी सर्वात आवडती आठवण कोणती? असा प्रश्न एका नेटकऱ्यानं विचारला. या प्रश्नाचं रिंकूनं केदारनाथच्या मंदिराजवळील फोटो शेअर करुन उत्तर दिलं. रिंकूचा झिम्मा-2 हा चित्रपट काही महिन्यांपूर्वी रिलीज झाला. या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. या चित्रपटात रिंकूसोबतच सुहास जोशी, निर्मिती सावंत,क्षिती जोग,सुचित्रा बांदेकर,सयाली संजीव आणि शिवानी सुर्वे या कलाकारांनी देखील प्रमुख भूमिका साकारली आहे.

# प्राजक्ता माळीचं हटके सेलिब्रेशन

अभिनेत्री प्राजक्ता माळी (PRAJAKTTA MALI) ही सोशल मीडियावर ॲक्टिव असते. प्राजक्ताच्या सोशल मीडियावरील पोस्ट नेटकऱ्यांचे लक्ष वेधतात. नुकताच प्राजक्तानं एक खास व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये प्राजक्ता ही तिच्या कुटुंबासोबत 31 डिसेंबरचं सेलिब्रेशन करताना दिसत आहे. प्राजक्तानं शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये ती कुटुंबासोबत ॲनिमल या चित्रपटामधील 'जमाल कुडू' या गाण्यावर डान्स करताना दिसत आहे. प्राजक्तानं डोक्यावर एक ग्लास ठेवलेला दिसत आहे. तसेच प्राजक्तानं तिच्या कुटुंबासोबत 'मै हूं डॉन' या गाण्यावर देखील डान्स केला. व्हिडीओमध्ये प्राजक्ता ही चुलीजवळ बसून भाकऱ्या थापताना देखील दिसत आहे. या व्हिडीओला प्रजक्तानं कॅप्शन दिलं, "ABOUT 31ST DECEMBER, आमचे बॅबी देओलS आणि डॉनS... यात माझा 2023 चा शेवटचा सेल्फी आणि 2024 चा पहिला सेल्फी देखील आहे." प्राजक्तानं शेअर केलेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव देखील केला आहे. एका नेटकऱ्यानं प्राजक्ताच्या व्हिडीओला कमेंट केली, "प्राजक्ता..खूपच भारी आहेस तू.कुटुंबाबरोबर जे तुझे क्षण असतात त्यांत तू खूप खुश, सुंदर दिसतेस. प्राजक्ता सर्व गुण संपन्न मुलगी." तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "असेच क्षण जपायचे असतात प्राजक्ता आणि तू ते खुप भारी जपतेस THAT'S WE LOVE YOU . तू भाकरी करतानाचा पूर्ण व्हिडीओ टाक ना . मी मागे म्हटले होते ना की तु A!! ROUNDER आहेस तला भाकरी करतांना पाहून ते सिद्ध झाले.



# 'खुर्ची' चा जबरदस्त ट्रेलर रिलीज

अभिनेता अक्षय वाघमारे (AKSHAY WAGHMARE) आणि राकेश बापट (RAQESH BAPAT) यांच्या 'खुर्ची' (KHURCHI) या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला आहे. या ट्रेलरमधील डायलॉग्सनं आणि कलाकारांच्या अभिनयानं प्रेक्षकांचे लक्ष वेधले आहे. या ट्रेलरला नेटकऱ्यांची पसंती मिळत आहे. खुर्ची या चित्रपटाच्या ट्रेलरची सुरुवात "मी राजवीर राजाराम देसाई,एक दिवस खुर्ची आपलीच असणार" या डायलॉगनं होते. त्यानंतर ट्रेलरमध्ये अक्षय वाघमारेची एन्ट्री होते. ट्रेलरमध्ये अक्षयचा "पाहिजे, पाहिजे, भिती पाहिजे." हा डायलॉग ऐकू येतो. अक्षय हा खुर्ची या चित्रपटात सम्राट ही भूमिका साकारत आहे. 'खुर्ची' या बहुप्रतीक्षित चित्रपटात राकेश बापट, अक्षय वाघमारे, आर्यन हगवणे, प्रीतम कागणे, श्रेया पासलकर, महेश घाग, कल्याणी नंदकिशोर, सुरेश विश्वकर्मा हे कलाकार महत्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत. चित्रपटाच्या ट्रेलरवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. खुर्ची या चित्रपटाचा ट्रेलर लॉंच इव्हेंट नुकताच पार पडला. या इव्हेंटला चित्रपटातील कलाकारांनी हजेरी लावली. तसेच अक्षय वाघमारेच्या पत्नीनं देखील या इव्हेंटला हजेरी लावली. 'खुर्ची' या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा शिव धर्मराज माने आणि संतोष कुसुम हगवणे यांनी सांभाळली आहे. हा चित्रपट 12 जानेवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. काही दिवसांपूर्वी खुर्ची या चित्रपटाचा टीझर रिलीज झाला होता. या टीझरनं देखील अनेकांचे लक्ष वेधले होते. राजकारणाचे विविध रंग या चित्रपटात रेखाटण्यात आले आहेत. चित्रपटाची गाणी प्रशांत मडपुवर, सौरभ आणि सोमनाथ शिंदे यांनी लिहिली असून, त्यांना सन्मित वाघमारे, अभिषेक काटे यांनी संगीत दिले आहे. आदर्श शिंदे, अवधूत गुप्ते, अभय जोधपुरकर, रसिका वाखरकर, अमिता घुगरी आणि आर्यन यांनी या चित्रपटातील गाणी गायली आहेत. आता 'खुर्ची' या चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत.

# 'ओरी'ची पलकनं का मागितली माफी?

गेल्या काही दिवसांपासून ओरी (ORRY) म्हणजेच ओरहान अवत्रामणीहा सोशल मीडियावर चर्चेत आहे. अशी कोणतीही सेलिब्रिटीची पार्टी नाही, ज्यामध्ये ओरी गेला नाही. ओरी प्रत्येक पार्टीचे फोटो सोशल मीडियावर शेअर करतो. त्या फोटोमध्ये त्याच्यासोबत वेगवेगळे सेलिब्रिटी देखील असतात. अशातच आता हा सध्या ओरी पार्टीमुळे नाही तर वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आहे. अभिनेत्री पलक तिवारी (PALAK TIWARI) आणि ओरीचे व्हॉट्सअॅप चॅट सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. दोघांच्या या व्हॉट्सअॅप चॅटनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. ओरी आणि पलक तिवारी यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हॉट्सअॅप चॅटमध्ये पलक ही ओरीची माफी मागताना दिसत आहे. पलकनं ओरीला मेसेज केला, "ओरी, मी पलक बोलत आहे. मी तुझी माफी मागावी, असं तुला वाटत आहे का?" यावर ओरीनं इमोजी शेअर करुन रिप्लाय दिला. ओरीच्या मेसेजनंतर पलकनं रिप्लाय दिला, "मी साराच्या सन्मानार्थ बोलत आहे." यावर ओरीनं रिप्लाय दिला, 'एकतर तू स्वाभिमानाने माफी मागत आहेस कारण तुला कसं बोलावं कळत नाही' आता पलकनं ओरीची माफी का मागितली? हा प्रश्न नेटकऱ्यांना पडला आहे. ओरी आणि पलक तिवारी यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हॉट्सअॅप चॅटमध्ये साराच्या नावाचा देखील उल्लेख आहे. ही सारा अली खान आहे, असा अंदाज नेटकरी लावत आहे. सारा अली खानचा भाऊ इब्राहिम अली खानला पलक डेट करत आहे, अशी चर्चा गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर होत आहे. पलक आणि इब्राहिम या दोघांना अनेक वेळा एकत्र स्पॉट देखील करण्यात आलं आहे. द वर्जीन ट्री या चित्रपटामधून पलक प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात मौनी रॉय आणि संजय दत्त हे देखील महत्वाची भूमिका साकारणार आहेत. तिचा किसी का भाई किसी की जान हा चित्रपट गेल्या वर्षी रिलीज झाला. तसेच इब्राहिम हा सरजमीन या चित्रपटामधून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे, असंही म्हटलं जात आहे. गेल्या काही दिवसांपासून ओरी (ORRY) म्हणजेच ओरहान अवत्रामणी हा सोशल मीडियावर चर्चेत आहे. अशी कोणतीही सेलिब्रिटींची पार्टी नाही, ज्यामध्ये ओरी गेला नाही. ओरी प्रत्येक पार्टीचे फोटो सोशल मीडियावर शेअर करतो. त्या फोटोमध्ये त्याच्यासोबत वेगवेगळे सेलिब्रिटी देखील असतात. अशातच आता हा सध्या ओरी पार्टीमुळे नाही तर वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आहे. अभिनेत्री पलक तिवारीआणि ओरीचे व्हॉट्सअॅप चॅट सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. दोघांच्या या व्हॉट्सअॅप चॅटनं अनेकांचे लक्ष वेधले आहेआणि पलक तिवारी यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या चॅटमध्ये पलक ही ओरीची माफी मागताना दिसत आहे.



# विनेश फोगटने घडवला इतिहास!

## ही कामगिरी करणारी ठरली पहिली महिला कुस्तीपटू

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताचं चौथं पदक निश्चित झालं आहे. भारताची धाकड कुस्तीपटू विनेश फोगटने कुस्तीच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे . ५० किलो कुस्तीच्या उपांत्य फेरीत विनेश फोगटचा सामना क्युबाच्या युस्नेलिस गुझमन लोपेझशी झाला. या सामन्यात विनेश फोगटने ५-० असा विजय मिळवला आणि अंतिम फेरी गाठली. अंतिम फेरीत पोहोचणारी ती पहिली भारतीय महिला कुस्तीपटू आहे. अंतिम फेरीत धडक मारल्यानंतर तिने भारताचे सुवर्ण किंवा रौप्य पदक निश्चित केले आहे.**



उपांत्य सामन्यात विनेश फोगटने पहिला गुण मिळवला होता. पहिल्या फेरीत विनेश फोगटने क्युबाच्या युस्नेलिस गुझमन लोपेझला एकही संधी दिली नाही. क्युबाच्या लोपेझने विनेश फोगटच्या पायांवर सातत्याने आक्रमण करण्याचा प्रयत्न केला, परंतु विनेश फोगटच्या चांगल्या बचावामुळे तिला गुण मिळवता आला नाही. यानंतर विनेश फोगटने सलग दोन गुण घेत सामन्यात ५-० अशी आघाडी घेतली. सामन्याच्या अखेरीस युस्नेलिस गुझमन लोपेझने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, परंतु विनेश फोगटने तिला कोणतीही संधी दिली नाही आणि एकतर्फी विजय मिळवला.उपांत्य सामन्यात विनेश फोगटने पहिला गुण मिळवला होता. पहिल्या फेरीत विनेश फोगटने क्युबाच्या युस्नेलिस गुझमन लोपेझला एकही संधी दिली नाही. क्युबाच्या लोपेझने विनेश फोगटच्या पायांवर सातत्याने आक्रमण करण्याचा प्रयत्न केला, परंतु विनेश फोगटच्या चांगल्या बचावामुळे तिला गुण मिळवता आला नाही. यानंतर विनेश फोगटने सलग दोन गुण घेत सामन्यात ५-० अशी आघाडी घेतली. सामन्याच्या अखेरीस युस्नेलिस गुझमन लोपेझने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, परंतु विनेश फोगटने तिला कोणतीही संधी दिली नाही आणि एकतर्फी विजय मिळवला.पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताचं चौथं पदक निश्चित झालं आहे. भारताची धाकड कुस्तीपटू विनेश फोगटने कुस्तीच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे . ५० किलो कुस्तीच्या उपांत्य फेरीत विनेश फोगटचा सामना क्युबाच्या युस्नेलिस गुझमन लोपेझशी झाला. या सामन्यात विनेश फोगटने ५-० असा विजय मिळवला आणि अंतिम फेरी गाठली. अंतिम फेरीत पोहोचणारी ती पहिली भारतीय महिला कुस्तीपटू आहे. अंतिम फेरीत धडक मारल्यानंतर तिने भारताचे सुवर्ण किंवा रौप्य पदक निश्चित केले आहे. विनेश फोगटने उपांत्यपूर्व फेरीत उत्कंठावर्धक लढतीत युक्रेनच्या ओसाना लिवाचचा ७-५ असा पराभव केला. याशिवाय पहिल्या सामन्यात तिने जपानच्या युई सुसाकीचा ३-२ असा पराभव केला. चार वेळा विश्वविजेत्या सुसाकीने टोकियो ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकले होते. विनेशने ऑलिम्पिक वगळता प्रत्येक मोठ्या खेळात पदके मिळवली आहेत. यामध्ये कॉमनवेल्थ गेम्समध्ये एक सुवर्ण, एक आशियाई स्पर्धेतील विजेतेपद, वर्ल्ड चॅम्पियनशिपमधील दोन कांस्यांसह आशियाई चॅम्पियनशिपमधील आठ पदकांचा समावेश आहे. मात्र, तिला रिओ आणि टोकियो ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकता आले नाही.

### भारताचे सुवर्ण किंवा रौप्य पदक निश्चित

विनेश फोगट, हिने गेल्या वर्षी मॅटपासून बराच काळ दूर होती आणि भारताचे माजी कुस्ती महासंघाचे प्रमुख ब्रिजभूषण सिंग शरण यांच्यावर लैंगिक गैरवर्तनाचा आरोप केल्यानंतर त्यांच्या विरोधात आंदोलन केले.पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताचं चौथं पदक निश्चित झालं आहे. भारताची धाकड कुस्तीपटू विनेश फोगटने कुस्तीच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे . ५० किलो कुस्तीच्या उपांत्य फेरीत विनेश फोगटचा सामना क्युबाच्या युस्नेलिस गुझमन लोपेझशी झाला. या सामन्यात विनेश फोगटने ५-० असा विजय मिळवला आणि अंतिम फेरी गाठली. अंतिम फेरीत पोहोचणारी ती पहिली भारतीय महिला कुस्तीपटू आहे. अंतिम फेरीत धडक मारल्यानंतर तिने भारताचे सुवर्ण किंवा रौप्य पदक निश्चित केले आहे. उपांत्य सामन्यात विनेश फोगटने पहिला गुण मिळवला होता. पहिल्या फेरीत विनेश फोगटने क्युबाच्या युस्नेलिस गुझमन लोपेझला एकही संधी दिली नाही.

# गोल्डन बॉय नीरज चोप्रा अंतिम फेरीत

## नीरजने टोकियो ऑलिम्पिकमध्ये 87.58 अंतरावर थ्रो केला

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पॅरिस ऑलिम्पिक 2024 मध्ये, भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्रा याने पात्रता फेरीत चमकदार कामगिरी करून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. त्याचा पहिला थ्रो ८९.३४ मीटर अंतरावर फेकला गेला. ही त्याचा या मोसमातील सर्वोत्तम थ्रो आहे. अंतिम फेरीसाठी पात्र होण्यासाठी, खेळाडूंना ८४ मीटरचा टप्पा पार करायचा होता. नीरज चोप्राने टोकियो ऑलिम्पिकमध्ये ८७.५८ अंतरावर थ्रो केला होता. जेव्हा त्याने सुवर्णपदक पटकावले.**



पात्रता फेरीत नीरजने भालाफेकमध्ये पहिल्या क्रमांकावर थ्रो करण्यासाठी आला होता. नीरजने पहिल्याच थ्रोमध्ये ८९.३४ मीटरचा थ्रो करून सर्व भारतीयांच्या चेहऱ्यावर आनंदाची लहर उमटवली. अशाप्रकारे भारताचा गोल्डन बॉयची आता अंतिम फेरीत आपल्या सुवर्णपदकावर पुन्हा एकदा नजर असणार आहे. नीरजचा हा थ्रोही त्याच्या मोसमातील सर्वोत्तम ठरला. याशिवाय तो त्याच्या वैयक्तिक सर्वोत्तम थ्रोच्याही जवळ आला. आता नीरज चोप्रा अंतिम फेरीत ९० मीटरचा अडथळा पार करण्याचा प्रयत्न करेल आणि भारताला सुवर्णपदक मिळवून देईल, अशी अपेक्षा आहे. नीरजशिवाय पाकिस्तानच्या अर्शद नदीमनेही पहिल्याच थ्रोमध्ये अंतिम फेरीसाठी पात्र ठरले. त्याने ८६.५९ मीटर फेक केली, जी त्याची हंगामातील सर्वोत्तम थ्रो होती. आता अंतिम फेरीत त्याचा सामना भारताच्या नीरजशी होणार आहे. दुसरीकडे, नीरज चोप्राचा सहकारी किशोर जेना ग्रुप-ए मध्ये होता. त्याने ८०.७३ मीटर थ्रो केला आणि तो त्याच्या गटात ९व्या स्थानावर राहिला.

### अंतिम फेरीत 90 मीटरचा अडथळा

तो अंतिम फेरीच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. नीरज चोप्रा पहिल्या फेरीत अव्वल ठरला.नीरज चोप्रासाठी अंतिम फेरीत सुवर्णपदकाचा बचाव करणे अजिबात सोपे असणार नाही. अंतिम फेरीत त्याचा सामना अ गटातून पात्र ठरलेल्या ज्युलियन बेव्हरसारख्या बलाढ्य खेळाडूशी होईल. त्याने पात्रता फेरीत ८७.७६ मीटर थ्रो केला. अ गटात, ज्युलियन बेव्हर व्यतिरिक्त, ज्युलियस येगोने ८५.९७ मीटर थ्रो केला आणि दुसरे स्थान मिळवून पात्र ठरला. ८५.६३ मीटर अंतरावर भाला फेकणारा वाल्देझ जेकब तिसरा होता. याशिवाय टोनी केराननने ८५.२७ मीटर थ्रो करून अंतिम फेरीत प्रवेश केला.पॅरिस ऑलिम्पिक 2024 मध्ये, भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्रा याने पात्रता फेरीत चमकदार कामगिरी करून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. त्याचा पहिला थ्रो ८९.३४ मीटर अंतरावर फेकला गेला. ही त्याचा या मोसमातील सर्वोत्तम थ्रो आहे. अंतिम फेरीसाठी पात्र होण्यासाठी, खेळाडूंना ८४ मीटरचा टप्पा पार करायचा होता.